भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २२३ अन्वये फिर्यादीचा जबाब.

मी, **हसन इमाम मुलाणी**, वय – ५२ वर्षे, व्यवसाय–वर्कशॉप, रा–भरणेवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

०१. मी जंक्शन आनंद नगर येथे सन २०१० मध्ये मिळकत क्रमांक ६५४ ही जागा घेतली. त्यामध्ये वर्कशॉप सुरु केले. दिनांक २४/१२/२०२३ रोजी आरोपी जावेद दस्तगीर मुलाणी याने वर्कशॉप समोरील रस्त्यावर विटा, वाळू, सिमेंट व बांधकामाचे साहित्य टाकून अडथळा निर्माण केला. सदर रस्त्याच्या हक्कासह आरोपीने मला मिळकत क्रमांक ६५४ खरेदी दिली होती. त्यानंतर मी ग्रामपंचायत आनंद नगर यांचेकडे आरोपीने रस्त्यावर अडथळा केल्याबाबत तक्रारी अर्ज दिला. तसेच आरोपीस वकीलांमार्फत नोटीस पाठवली. मात्र आरोपीने रस्त्यावर बांधकाम सुरु केले. त्यामुळे मी इंदापूर येथील न्यायालयात आरोपीविरुध्द दिवाणी दावा क्रमांक २२/२०२४ दाखल केला. तो प्रलंबित आहे. त्यानंतर दिनांक १७/०५/२०२६ रोजी मी व माझी पत्नी तेथे पाहणी करण्यासाठी गेलो. तेथे पुर्व बाजूस छोटा बोळ असून तेथून चालत जाण्यासाठी जागा आहे. आम्ही पाहणी करुन आलो. माझ्या वर्कशॉपमधील वायर तुटली होती. रात्री ०८.३० वाजता माझा मुलगा अल्ताफ याच्या मोबाईलवर आरोपीचा कॉल आला. आरोपीने फोनवरुन "माझ्या प्रॉपर्टीमधून यायचे नाही, तुमचे हात–पाय तोडेने, खोट्या चोरीच्या केसेस करेन, केस पाठीमागे घ्या, तुझ्या बापाच्या गांडीत किती दम आहे बघतो, त्याला पाठवून दे, त्याला सरळ करायला वेळ लागणार नाही'' अशी धमकी दिली. त्यामुळे मी दिनांक १८/०५/२०२६ रोजी पोलीस ठाण्यात जावून तक्रार दाखल केली. पोलीसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल करुन घेतला. मात्र आरोपीविरुध्द कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे मी प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे. आरोपीविरुध्द कडक कार्यवाही करण्यात यावी व आरोपीला शिक्षा देण्यात यावी.

...............................
फिर्यादीची सही /अंगठा

दिनांक–१०/०८/२०२६
ठिकाणः–इंदापूर

10/8/2026

(प्र. चं. बारटक्के)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.
ता. इंदापूर, जि. पुणे.